

या कविता संग्रहातील कवितांची निर्मिती शेतकऱ्यांविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यातून झाली आहे. त्यामुळे साहित्यिक मूल्यांच्या कसोटीवर या सर्वच कवितांचे मूल्यमापन करणे गैर ठरेल. एक मात्र खरे की, या कवितांपैकी काही कवितांमध्ये साहित्यिक मूल्यांच्या कसोटीवरही उतरण्याची क्षमता आहे.

सध्या शेतीची-पर्यायाने शेतकऱ्यांची अतिशय दुरावस्था झालेली आहे. शेतकरी कोलमडून पडत आहे, आत्महत्या करीत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या जगण्याला उभारी देण्याची, त्यांची हिंमत चेतवण्याची, आयुष्याची लढाई लढण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण करणे निकडीचे आहे. हे काम करण्यात हा कवितासंग्रह खारीचा वाटा उचलेल अशी आशा आहे.

दि. २६ जानेवारी २०१६ - प्रा. रा.रं. बोराडे

ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक

अ. भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ

आम्ही लटिके ना बोलू

कणसातली माणसं – प्रातिनिधिक शेतकरी काव्यसंग्रह

# कणसातली माणसं

## प्रातिनिधिक काव्यसंग्रह



कणसातली माणसं-प्रातिनिधिक शेतकरी काव्यसंग्रह

# कणसातली माणसं

**प्रातिनिधिक शेतकरी काव्यसंग्रह**

**संपादक – गंगाधर मुटे**



**अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ**

**कणसातली माणसं**
© अ.भा.मराठी शेतकरी साहित्य चळवळ
आर्वी (छोटी) ४४२३०७
ता. हिंगणघाट, जि. वर्धा
भ्रमणध्वनी : ९७३०५८२००४

प्रकाशक : अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ
: आर्वी (छोटी) ४४२३०७ ता. हिंगणघाट, जि. वर्धा
भ्रमणध्वनी : ९७३०५८२००४
E-mail : abmsss2015@gmail.com
Web : www.baliraja.com
प्रथमावृत्ती : २०/०२/२०१५ (प्रती ३०००)
प्रकाशन क्रमांक : ०१
मुद्रक :
अक्षरजुळवणी : वसुंधरा प्रकाशन, नागपूर
मुखपृष्ठ : ओमप्रकाश देसले
किंमत : रु. १००/-

## संपादकीय....

''कणसातली माणसं'' हा प्रातिनिधिक शेतकरी काव्यसंग्रह वाचकांच्या हाती सुपूर्द करताना एक नवा मैलाचा दगड रोवला की काय, असे उगीच वाटायला लागले आहे. तसे वाटण्यामागे कारणही ठोसच आहे; माझ्या अल्पशा बौद्धिक कुवतीनुसार व जाणिवांच्या सीमित ज्ञानकक्षेनुसार शेतीविषयाला वाहिलेला स्वतंत्र प्रातिनिधिक शेतकरी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा बहुधा हा पहिलाच प्रयोग आहे.

निव्वळ शेतीवरच उपजीविका अवलंबून असणाऱ्यांची संख्या कधीकाळी ९० टक्क्यांपेक्षा जास्त होती तेव्हाही आणि ५२ टक्क्यांपेक्षा जास्त संख्या असलेल्या आजही; साहित्यक्षेत्राच्या दृष्टीने सदासर्वदा शेती हा विषय नगण्य या शब्दाला साजेशा पातळीवरच स्थिर राहत आलेला आहे. याचा अर्थ असाही नाही की आजवर शेती हा विषय घेऊन लिहिणारे झालेच नाही; पण एकतर हा विषय रुचीपालट म्हणून तोंडी लावण्यापुरता एखाद्या जिन्नसासारखा वापरला गेला किंवा लोकांना आवडावे, वाचकांना रुचावे व मुख्यत्वे प्रकाशकांना विक्रीमुल्य आढळावे याची काळजी घेतच लेखणीची मध्यवर्ती संकल्पना शेती ऐवजी ग्रामीण जीवनाभवतीच पिंगा घालत ठेवल्या गेली. शेतकरी जीवन आणि ग्रामीण जीवन हे दोन स्वतंत्र विषय असूनही त्याची अशी काही सरमिसळ झाली की ग्रामीण जीवन म्हणजेच शेतकरी जीवन अशी ढोबळमानाने अलिखित व्याख्याच प्रचलित झाली.

शेती विषय रुक्ष असला तरी ग्रामीण जीवन रुक्ष नाही. शेतात राबताना गळणाऱ्या घामाच्या धारा सुगंधी वाटत नसल्या तरी गावात वाहणाऱ्या दारूच्या धारा मात्र साहित्यसृजकांना सुगंधी व रंजक वाटल्या असाव्यात. फाटके लुगडे नेसून शेतीत राबणाऱ्या माउलीची उघडी मांडी बघून त्यात अठराविश्व दारिद्र्याची मूळं दिसण्याऐवजी त्या उघड्या मांडीकडे कामुक नजरेने पाहणारा गावचा पाटील रेखाटने साहित्यसृजकांना अधिक साहित्यमूल्य व बाजारमूल्य असलेले वाटले असणार. शेतीतल्या अठराविश्व दारिद्र्याची सोडवणूक करण्याची ऐपत असलेले साहित्य प्रसवण्यासाठी, शेतीचा अर्थशास्त्रीय अभ्यास करत बसण्याऐवजी आहे तेच दारिद्र्य मनोरंजनाच्या भट्टीत पकवून स्वादिष्ट थाळीच्या रूपात वाचकांची वाचनाची भूक शमविण्यासाठी वापरणे साहित्यसृजकांना जास्त सोयीचे वाटले असणार हे उघड आहे.

''देवाची कृपा होईल, निसर्ग देवता प्रसन्न झाली की बदाबदा पाऊस कोसळेल. बदाबदा पाऊस कोसळला की रान हिरवेगार होईल. रान हिरवेगार झाले की सुगीचे दिवस येऊन शेतकऱ्याची गरिबी एका रात्रीतून संपुष्टात येईल'' अशा येरागबाळ्या, अर्थवादाचा लवलेश नसलेल्या, शास्त्रशून्य, भिकार कल्पनाविलासापलीकडे आजवरच्या स्वतःला शेतकरी पुत्र म्हणविणाऱ्या कवींनाही फार काही उंच भरारी घेता आली नाही, असेही इतिहासाने नमूद केले आहे. ''शेतीत गरिबी असण्याचे कारण शेतकरी अज्ञानी, व्यसनाधीन, उधळ्या, आळशी आहे म्हणून नव्हे तर तो घाम गाळून जे पिकवतो तो शेतमाल स्वस्तात लुटून नेण्याऱ्या शासकीय अधिकृत शेतकरीविरोधी धोरणात दडले आहे'' एवढे एक वाक्य उच्चारायला व लिहायला युगपुरुष शरद जोशींना जन्म घ्यावा लागला, यातच शेतीसाहित्याच्या अनुपयुक्ततेचे गमक दडले आहे. खरं तर हा शेतीसंबंधित साहित्यिकांचा सपशेल पराभव असल्याचे एकदातरी जाहीरपणे मान्य करायलाच हवे.

आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की समग्र वैचारिक उत्क्रांतीच्या प्रवाहाची दिशा



फक्त लिहिणारे आणि बोलणारेच ठरवू शकतात. ही क्षमता तिसऱ्या कुणातच नसते. शेतीमधली गरिबी आणि शेतकऱ्याच्या आयुष्यातील लाचारीचे जिणे संपवून त्याच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाने जगण्याइतपत दिवस खेचून आणायचे असेल तर जनमानसाची सामूहिक विचार पद्धती बदलावी लागेल आणि हे कार्य फक्त लिहिणारे व बोलणारेच करू शकतात. गेले सुमारे तीन तप राज्यात शेतकरी चळवळ भक्कम अर्थशास्त्रीय पायावर उभी आहे. या चळवळीने मुक्या-बहिऱ्या शेतकऱ्याला बोलते केले. आज शेकड्याने, हजाराने नव्हे तर लाखोच्या संख्येने तर्कशुद्धतेने शेतीविषयावर बोलणारे व शेतीशास्त्र मांडणारे योद्धे या चळवळीने गावागावात निर्माण केले ही शेतकरी चळवळीची जमेची बाजू असली तरी लिहिणारे निर्माण करण्यात मात्र हीच शेतकरी चळवळ सपशेल अपयशी ठरली. सर्वश्री प्रा. भास्कर चंदणशीव, इंद्रजीत भालेराव, शेषराव मोहिते, अमर हबीब व आणखी काही तुरळक अपवाद वगळता तर्कशुद्ध अर्थशास्त्रीय साहित्यसृजकांची यादी इथेच आटोपते. युगात्मा शरद जोशींचे अर्थशास्त्रीय विचार अडाणी शेतकऱ्यांच्या माजघरात पोचले पण हेच विचार साहित्यसृजकांच्या अंगणातील परसबागेपर्यंतही का पोचले नाही? हा कळीचा मुद्दा आहे. शेतकऱ्यांचे पोट शेतीवर अवलंबून असते याउलट साहित्यसृजकांचे पोट शेतमालाच्या लुटीतून निर्माण होणाऱ्या संचयावर अवलंबून असते, हेच तर या मागचे कारण नाही ना?

कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेती-साहित्याचा शेतीमधल्या प्रत्यक्ष वास्तवाशी काही संबंध उरला आहे किंवा नाही याचा शोध घेण्यासाठी, कृषिजगताला भेडसावणाऱ्या समस्यांची मराठी साहित्य विश्वासोबत सांगड घालण्यासाठी, नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या शेतीअर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी आणि मराठी साहित्यविश्वाकडून कृषिजगताला असलेल्या अपेक्षांची जाणीव करून देण्यासाठी नागपूर येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात २० व २१ फेब्रुवारी २०१६ ला दोन दिवसाचे दुसरे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे. या मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे स्वरूप आपापल्या कौशल्यगुणांचं, प्रतिभेचं प्रदर्शन मांडून वाहवा मिळवणाऱ्या हौश्या-गौश्या-नवश्यांचा जमाव यापुरतेच केवळ मर्यादित न राहता सारस्वतांना कल्पनाविस्तारासाठी बौद्धिक मेजवाणी देणारे प्रशिक्षण शिबीर ठरावे आणि लेखणीच्या माध्यमातून शेतीची दुर्दशा थांबवून शेतकऱ्याच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे दिवस खेचून आणण्याइतपत शक्तिशाली सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण कण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्याचा उद्देश या संमेलन आयोजनामागे आहे.

या दुसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या निमित्तानेच प्रत्यक्ष कृतीचे पहिले पाऊल म्हणून ''कणसातली माणसं'' हा प्रातिनिधिक शेतकरी काव्यसंग्रह वाचकांच्या भेटीस येत आहे. प्रयोग नवा आहे आणि माझ्यासहित बहुतांश कवीही नवखेच आहेत. जे थोरामोठ्यांना जमले नाही ते या नवख्या कवींना जमलेच पाहिजे, असा आमचा दुराग्रह नाही तद्वतच कुणाचा असूही नये. त्यामुळे या संग्रहातील रचनांना साहित्यिकमुल्याच्या वगैरे कसोट्या लावण्याचे अजिबात प्रयोजन उरत नाही.

वास्तव आणि प्रगल्भ शेतीसाहित्यकृती निर्मितेच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणून रसिक वाचकांनी व समीक्षकांनी या काव्यसंग्रहाचे स्वागत करावे, अशी माफक अपेक्षा आहे.

**– गंगाधर मुटे**

# अनुक्रमणिका

**कणसातली माणसं**


| | | |
|---|---|---|
| शीक बाबा शीक लढायला शीक | इंद्रजित भालेराव | ७ |
| विचारवारे | श्रीकृष्ण राऊत | ८ |
| घामाची लावणी | ज्ञानेश वाकुडकर | ९ |
| आमचा पंधरा आगस्ट कवा हाय | शेषराव मोहिते | १० |
| आयुष्य कडेवर घेतो | गंगाधर मुटे 'अभय' | ११ |
| आलो तुझ्या न दारी | रवी धारणे | १२ |
| आसवांची शेती आता पिकवू नका | रविंद्र कामठे | १३ |
| इसवी सन २०७५ | रावसाहेब जाधव | १४ |
| उघडण्या नशिबास येते साल राजे | राज पठाण | १६ |
| ऊठ मर्दा ऊठ | गंगाधर मुटे 'अभय' | १७ |
| ऑडीट | रावसाहेब कुंवर | १८ |
| कदाचित | रावसाहेब जाधव | २० |
| काय झालंय रे तुला पावसा | रविंद्र कामठे | २१ |
| काळीमाय | दर्शना देशमुख | २३ |
| काळ्या आईच्या कुशीत | विनिता कुलकर्णी पाटील | २४ |
| घरटं | सौ. शैलजा कारंडे | २५ |
| घाम पेरतो घास तुम्हाला मिळतो आहे | राज पठाण | २७ |
| चाहूल | धिरजकुमार ताकसांडे | २८ |
| चिमण्या | राजीव जावळे | २९ |
| जय जवान जय किसान | प्रकाश मोरे | ३० |
| जीवन एक लढाई | किशोर बळी | ३१ |
| जुगार | संघमित्रा खंडारे | ३३ |
| झोपी गेलं रे सरकार | रामकृष्ण मार्खंडी रोगे | ३५ |
| ती.... | विनिता माने - पिसाळ | ३६ |
| तु जान माणसा, सुजान माणसा | डॉ. रविपाल भारशंकर | ३८ |
| दुष्काळ | रविंद्र कामठे | ३९ |
| नमन श्रमदेवाला...! | गंगाधर मुटे 'अभय' | ४० |
| नावहीन गाववेदना | रावसाहेब जाधव | ४१ |





| | | |
|---|---|---|
| पायाखालची वीट दे...! | गंगाधर मुटे 'अभय' | ४२ |
| पाहून घे महात्म्या | गंगाधर मुटे 'अभय' | ४३ |
| बळीराजा | रविंद्र कामठे | ४४ |
| बळीराजा | प्रकाश मोरे | ४५ |
| बाबा कसे | निलेश कवडे | ४६ |
| बाबा गेले आभाळात | राजीव जावळे | ४७ |
| बायल्यावाणी कायले मरतं? | गंगाधर मुटे 'अभय' | ४८ |
| बोल बैला बोल | गंगाधर मुटे 'अभय' | ४९ |
| भय | विनोद मोरांडे | ५० |
| भरवसा | विनिता माने - पिसाळ | ५१ |
| भारत माझा देश आहे | श्रीकांत धोटे | ५२ |
| माझा शेतकरी बाप | नजीमखान | ५४ |
| माझी माय | दिपक यादवराव चटप | ५६ |
| माणसासाठी कणसात दाना | रावसाहेब जाधव | ५७ |
| मित्रा | नयन महेश राजमाने | ५८ |
| मोरा मोरा नाच रे | गंगाधर मुटे 'अभय' | ६० |
| मी होतो बाप | रावसाहेब जाधव | ६१ |
| या जीवनात जे जे | रवी धारणे | ६२ |
| रानमेवा खाऊ चला...! | गंगाधर मुटे 'अभय' | ६३ |
| विनासोबत्यांचा उभा जन्म गेला | राज पठाण | ६४ |
| शब्द झाले शस्त्र त्यांचे वार झाले | राज पठाण | ६५ |
| शेतकरी | बदीऊज्जमा बिराजदार | ६६ |
| शेतकऱ्यांच सामर्थ्य | श्रीकांत धोटे | ६७ |
| शेतकऱ्यांचा गळफास | दिलीप भोयर | ६९ |
| सांगू कधी | रविंद्र कामठे | ७० |
| साबिरवाणी | बदीऊज्जमा बिराजदार | ७१ |
| सुनसान या घराला दळतात चार भिंती | राज पठाण | ७२ |
| स्वदेशीचे ढोंगधतूरे | गंगाधर मुटे 'अभय' | ७३ |
| हक्क जगण्याचे वंचित होते | रविंद्र कामठे | ७४ |
| हताश औदुंबर | गंगाधर मुटे 'अभय' | ७५ |
| हाडाचे शेतकरी | शरद ठाकर | ७६ |

## शीक बाबा शीक लढायला शीक



शीक बाबा शीक लढायला शीक
कुणब्याच्या पोरा आता लढायला शीक

लाजरेपणा बुजरेपणा बाजारात ईक
घेऊ नको फाशी बाबा खाऊ नको इख
मागं मागं नको पुढं सरायला शीक
आत्महत्या नको हत्या करायला शीक

कोट्यावधी कर्ज घेती दलालांची पोरं
बुडविती त्याचा कधी करिती ना घोरं
तुला टाळून जाणाऱ्याला अडवायला शीक
घेतलेली कर्ज सारी बुडवायला शीक

उंटावून शेळ्या हाकी सरकारं शहाणं
त्याच्यामुळं जीव तुझा पडला गहाण
तुझं ऐकत नाही त्याला झाडायला शीक
तूच दिली सत्ता त्याला पाडायला शीक

जातील हे दिस आणि होईलही ठीक
उद्या तुझ्या शेतामधी उधाणेल पीक
गाळलेल्या घामासाठी रस्त्यावर टीक
हक्कासाठी लढ बाबा मागू नको भीक

**– इंद्रजित भालेराव**
**परभणी**



## विचारवारे



जे शोध भाकरीचा घेण्या घरून गेले;
हे वृत्त आज आले की ते मरून गेले

नावा किती बुडाल्या त्याचा हिशोब नाही;
पण दीपस्तंभ सारे सागर तरून गेले

गावात पापण्यांचा दुष्काळ कोरडा हा
वाटे जरी रडावे अश्रू सरून गेले

हा चेहरा तुझाही मळकाच वाटतो रे;
आयुष्य का तुझेही ते वापरून गेले

वेगात खूप तूही वाहू नकोस वाऱ्या;
फाटेल आणखी हे लक्तर विरून गेले

मेंदूस सर्व त्यांच्या झाला लगेच लकवा;
तुमचे विचारवारे ज्यांच्यावरून गेले

**– श्रीकृष्ण राऊत**
**अकोला**

## घामाची लावणी



कशास जाऊ काबा-काशी
देवच येईल माझ्यापाशी
माझी माती, माझा माणूस
माझे चारीधाम..
राजसा,
इथेच गाळू घाम..!!

गाई माझ्या.. गोकुळ माझे
रानावरती घुंगुर वाजे
ऊडे वासरू वाऱ्यावरती
भाव किती निष्काम..
राजसा,
इथेच गाळू घाम..!!

इथले वैभव.. इथले जगणे
पत्थरातही फुलून बघणे
काट्याच्याही कुशीत इथल्या
वेलीला आराम..
राजसा,
इथेच गाळू घाम..!!

भिजले गोकुळ.. भिजली राधा
तना-मनावर व्याकुळ बाधा
या मातीला फुटतील आता
लाख लाख घनश्याम
राजसा,
इथेच गाळू घाम..!!

**- ज्ञानेश वाकुडकर**
**नागपूर**



## आमचा पंधरा आगष्ट कवा हाय?

जवा उद्या पंधरा आगस्ट असायचा
तसा माय माझी रानातून आल्यावर
फाटकी आंगी टाचायची
नवे कापडं नाहीत म्हणून
बापावर राग काढायची
कर्मावर बोटं मोडायची

तवा बाप माझा
कोपऱ्यातल्या दिव्या जवळ बसून
पायातले काटे काढायचा
तिथं मेण लावून जाळायचा
अन व्हटावर व्हट गच्च दाबून
डोळ्यातून टीपं गाळायचा
जवा उद्या पंधरा आगस्ट असायचा

पण अलीकडं अलीकडं
पंधरा आगस्ट आला की
बाप माझा बिथरल्यावणी करतोय
कुळवाचं रुमणं हातात घेतोय
आणि नासिकात, निपाणीत
सांडलेल्या रक्ताच्यान
आमचा पंधरा आगस्ट कवा हाय मंतोय
आमचा पंधरा आगस्ट कवा हाय?

**- शेषराव मोहिते**
**लातूर**

## आयुष्य कडेवर घेतो



झुंजूमुंजू पहाटेला, आभा चढे आभाळाला
काळोखाच्या भेगातुनी, सूर्य डोकावतो
गारठल्या पंखामधी, आशा जागवतो

सुन्यासुन्या शिवाराला, निजलेल्या आवाजाला
चेव येण्याला कोंबडा, दारी बांग देतो
सुस्तावल्या आळसाला दूर पांगवतो

अन्नासाठी चिलंपीलं, खोप्यामधी किलबिल
लेकराची साद येता, पान्हा जन्म घेतो
चोचीमधी ममतेला, चिंब भिजवतो

'अभय'ता पेरताना, रुजलेली फुलताना
फळलेली पाहताना, जेव्हा आनंदतो
तेव्हा मीच माझ्या आयुष्याला, कडेवरी घेतो

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**
**९७३०५८२००४**



## आलो तुझ्या न दारी



आलो तुझ्या न दारी केली कधी न वारी
भेटीस पांडुरंगा .... येरे अता शिवारी!!

पाहून घे जरासा डोळा भरून मजला
घेवून फास हाती आहे उभा मुरारी!!

आरास ती दिव्यांची दारी तुझ्याच असते
अन् झोपडीत माझ्या जळते चुली दुपारी!!

नैवेद्य तुच खातो.... तूपात भाजलेला
पिकवून माल शेती आम्हा सदा भिकारी!!

संपेल का कधी हा व्यापार यातनांचा
आहे पुढ्यात अमुच्या निर्लज्ज्य सावकारी!!

**– रवी धारणे**
**चंद्रपूर**
**९०४९००८५९३**

## आसवांची शेती आता पिकवू नका



मेघानो ढळण्याचे कष्ट घेऊ नका
मेलेल्या भावनांना जिवंत करू नका।।

आतड्यांना पडलेल्या पिळांनो उगाच
अन्नाच्या आहारी अजिबात जाऊ नका।।

देहाचीच बोली देहाचीच भाषा आहे
झिडकारले फटकारले तरी काऊ नका।।

नशिबात नसेल तुकडा भाकरीचा
दोष उगाच ह्या पावसाला देऊ नका

अडकलाय फुटक्या नशिबाच्या फेऱ्यात
हातावरील रेघांमध्ये हो गुंतू नका।।

युद्ध तुमचे जुंपले आहे निसर्गाशी
हात पाय गाळून अता असे बसू नका।।

बळीराजाची आसवे वाया का घालविता
आसवांची शेती आता पिकवू नका।।

**– रविंद्र कामठे**
**पुणे**
**९८२२४०४३३०**



## इसवी सन २०७५



इसवी सन २०७५
माझा नातू
शैक्षणिक पात्रातांचे जंगल तुडवीत
पोहचलाय बापजाद्याच्या
लांबीरुंदी गमावलेल्या
टीचभर जमिनीच्या तुकड्याच्या बांधावर
आणि
करू लागलाय विचार
उंचीच्या विस्ताराचा...

अनेक मजली मातीच्या थरांतून तो
उगवू पाहतोय
फळभाज्या, पालेभाज्या आणि काही फुले
संकरलेली...

बांधावरचे वडाचे झाड
सलले त्याच्या डोळ्यांत
वठलेल्या खोडासारखे...

इंटरनेट आणि नव्या तंत्राची जोड
प्रिय होतेय त्याच्या हृदयाच्या ठोक्यांइतकीच
यंत्राची धडधड...

उगवू पाहणाऱ्या प्रत्येक कोंबाच्या तळाशी तो
गुंतवीत जातो
अर्थशास्त्रातील सिद्धांत
आणि पोटाभोवती फिरणारी सृष्टी
साक्षात लोळण घेतेय त्याच्या पायाशी
उत्पादनाची जुळवीत गणिते...

आपत्य प्राप्तीचा विषय त्याने
बाजूलाच ठेवलेला दिसतो
पत्नीच्या संमतीने...

नाही म्हटल्यास
राहायला जागा केलीय त्याने
फूलशेतीच्या शेजारी इशान्य कोपऱ्यात
जेथे उपलब्ध होतेय त्याला
उत्तम नेटवर्क
आणि स्वतःपुरती वीजही..
मात्र
तेथे मला
बाप काही दिसत नाही त्याचा
चष्म्याच्या जाड भिंगातूनही...

ओळखतही नाही त्याला
तळमजल्यात पाळलेली गाय
ती असते आसूसलेली
कासेला भिडणाऱ्या यंत्राच्या प्रेमळ स्पर्शासाठी...
कदाचित
वासरूही नाकारेल ती
थोड्याच दिवसांत

इसवी सन २०७५...

**– रावसाहेब जाधव**
**चांदवड**
**९४२२३२१५९६**



## उघडण्या नशिबास येते साल राजे



उघडण्या नशिबास येते साल राजे;
एवढे खोटे न अमुचे भाल राजे!

जात धर्माची उधारी फार झाली
आत्महत्या या कुठे फेडाल राजे?

कोणता आजार हा जडला तुम्हाला?
नांगराचा फाळ मी, फोडाल राजे?

मान तुमचा राखला आजन्म आम्ही,
कुर्निसातां बेगडी त्या घ्याल राजे?

दैव ऐसे कोपते हे नेहमी का?
शेत हे अमुचे सदा का भाल राजे?

पाप आम्ही काय केले कोण जाणें,
आसवांच्या या नद्या खोडाल राजे?

प्रश्न तुमचा व्यर्थ का बलिदान करता
वाचले त्यांना विचारा हाल राजे!

शिक्षणाचे दार हे ऐसे खुले की,
निरक्षरांना मानता का ढाल राजे?

घाम अमुचा साठला घासात तुमच्या,
अन् पुन्हा झालोत कच्चा माल राजे!

**– राज पठाण**
अंबाजोगाई, जि. बीड
९७६४९८०२२४

## ऊठ मर्दा ऊठ



ऊठ मर्दा ऊठ
आवळून घे मूठ
हाण त्याच्या टाळक्यात
पायामधला बूट
सत्तेपुढे शहाणपण
जेव्हा व्यर्थ जाते
माणुसकीचे लचके तोडून
लाचखोर खाते
पौरुषाच्या नशेचे, तेव्हा लाव दोन घूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट
अन्यायाची सीमा जेव्हा
मर्यादेला लांघते
तुझे हक्क तुडवून
तिरडीवर बांधते
शेपटी तेव्हा खाली नको, वाघासारखा ऊठ
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट
पोशिंद्याच्या छाताडावर
हरामींच्या मौजा
तेव्हा राज्य करतात
लुटारूंच्या फौजा
सत्ता आणि दलालांची, कर ताटातूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट
माय तुझी बैलावाणी
राबराबून मेली
गल्लीमध्ये मुळं अन्
दिल्लीमध्ये वेली
'अभय'तेने शोध घे, कोणी केली लूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

**– गंगाधर मुटे 'अभय'**



## ऑडीट



ज्याच्या जमेच्या बाजूला
काहीच नाही
त्यांन कशी लिहावी
खर्चाची वही
जरा सांगा ना साहेब

माझ्या बापाच्या हयातीच
ऑडीट एकदा करा ना साहेब

शेतीबरोबर राबवल्या त्यानं
अनेक कुचकामी योजना
जोडधंदा म्हणून
तरी बसला नाही
खर्चाचा मेळ
म्हणून तर आली त्याच्यावर
अशी लटकवून घेण्याची वेळ

किती पाळल्या बकऱ्या कोंबड्या
किती पोसल्या म्हशी
पडत आला बाप माझा
नेहमी तोंडघशी

पिढी दर पिढी
होत आलेली लुट
आणि दरवर्षी उत्पन्नात
वाढलेली तुट
अशा बेभरोशी
जिंदगीच्या अंदाजपत्रकात
कशी करावी भाकरीची तरतूद
नाही समजले त्याला
कित्येक पिढ्या खपल्या तरी

तुमच्या मेजरमेंट बुकमध्ये
कुणी नोंदायचं मोजमाप
माझ्या बापाच्या कष्टाच
आणि कुणी करायचं मुल्यांकन
त्याच्या घामाचं
जसा सांगा ना साहेब

साहेब
तुमच्या गोषवाऱ्यात
एक आठवणीने नमूद होवू द्या
मालकीच्या मालाचं
मोल ठरवायचा अधिकार
माझ्या बापाकडे येऊ द्या

नाही तर एक करा साहेब
ठेवा या व्यवस्थेलाचं आक्षेपाधीन
करा असा स्पेशल रिपोर्ट
ज्याचं कधीच होवू नये क्षमापन

नेमा असं एक
सक्षम प्राधिकरण
जे मागू शकेल
माझ्या बापाला उध्वस्त करणाऱ्या
पापाचा खुलासा
आणि देवू शकेल दिलासा
फासावर लटकवून
या व्यवस्थेला....

– रावसाहेब कुंवर
धुळे
९४२३९४२८१०



## कदाचित....



माझ्या चतकोर
वावराशेजारीच
उभा राहिलाय एक कारखाना....
सोडू लागलाय सुस्कारे
चिमणीतून
जागतिकीकरणाच्या वासाचे....
आणि डोक्यावरल्या मोकळ्या अवकाशात
वावरू लागलेत
पिंजारलेले काळे ढग
धमकावत फुफुसांना....
तशातच
डरकाळ्या राक्षशी आवाजच्या
कान-काळजाचे अस्तित्व
नाकारणाऱ्या....

एव्हाना
काळवंडू लागलीत मुकी झाडे
आणि
बिथरू लागलीत पाखरंही
अंगाखांद्यावर खेळणारी....
आताशा
माझंही पोरगं
ओढलं गेलंय नवीन प्रवाहात
वेडगळ ठरवत
जुन्या पिढीला....

होइलही शहाणी
त्याची पुढली पिढी
कदाचित....
वेळ निघून गेल्यावर।

– रावसाहेब जाधव
चांदवड

## काय झालंय रे तुला पावसा



काय झालंय रे तुला पावसा
रागावलायसा का रे पावसा।।

असं काय रे हे तुझे पावसा
रात्री नाही तर पड न दिवसा।।

पडलास कि नाही तू थोडासा
दिलासा मिळतो आम्हां माणसा।।

धरणीसही आहे रे तुझीच लालसा
कशाला ताणतोस रे ही जिज्ञासा।।

ये रे ये रे, ये ना रे पावसा
वाचव ना रे आमच्या कष्टाचा पैसा।।

नाही होणार कधीच हा खोटा पैसा
नागरून पेरलंय बियाणं पसा पसा।।

अधुरी तुजवीण ही धरणी पावसा
तिच्यासाठी का होईना ये रे पावसा।।

बिथरतील सगळी पाखर आता पावसा
दाणा पाण्यावाचून सुकल्या रे नसा न नसा।।

येशील तू अवकाळी बरं का पावसा
नुकसान करून रडवशील ढसा ढसा।।

खरंच का रे तुला यायचंय का पावसा
पड ना रे मग मन लावून जोर तो कसा।।



पाप्यांना धुवायचीत पापे खसा खसा
ह्या गोदावरीस येऊ देत ना पूर पावसा।।

शुद्ध करून ह्या साऱ्यांना कसा
जमलच तर साठीव पाणी धरणात पावसा।।

जायचय रे मला वारीला, घेतलाय मी वसा
दुबार पेरणीनं पिकवू रान आपण पावसा।।

चंद्रभागेच्या तीरी लागली दिंड्यांची रांग दिवसा
हलकेच बरसुनी सरी, कर तू बारीला दंग पावसा।।

मेहरबानी होईल आलास तर मृगावरुनी पावसा
ओवाळतील आरती, तुझी रे सुवासिनी पावसा।।

**– रविंद्र कामठे**
**पुणे**
**९८२२४०४३३०**

## काळीमाय



‘बा’ च्या डोळ्यादेखत शेताचा लिलाव होत होता
‘बा’ च्या डोळ्यात पाण्याचा टिपुससुद्धा दिसत नव्हता

‘माय’ फाटक्या पदरानेच भरलेले डोळे टिपत होती
कर्जाच्या बोज्यातच आमची काळी माय गेली होती
क्षणात सारं होत्याचं नव्हतं झालं होतं
बापानं जीवापल्याड जमिनीला जपल होतं
काजळाच्या वडीसारखं मेणाहून मऊ रान होतं

कागदावर अंगठा देताना ‘बा’ धायमोकलून रडला
दावणीच्या सर्जा राजांनी भ्या करत हंबरडा फोडला

दिस कवाच अस्ताला गेला होता
बा भाकर न खाताच पडवीवर पडला
तांबडं फुटाया मायीनं हंबरडा फोडला
काळजाच्या साऱ्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या
‘बा’ फासावर शांतपणे लटकत होता

एक शबुदही न बोलता
त्यानं जगाचा निरोप घेतला होता
काळी मायच नाही तर मी कशाला?
असं म्हणतच त्यानं जीव सोडला होता

**– दर्शना देशमुख**
**लातूर**
**८९७५२५१८०७**



## काळ्या आईच्या कुशीत



काळ्या आईच्या कुशीत
एक करपला कोंब
कसं आभाळ वांझोटं
नाही पावसाचा थेंब..!

पोट ईत ईत खोल
तशा खोलं खोलं भळी
जातो फासावर बाप
आळी मिळी गुपचिळी..!

गाय.. माय उपाशीच
दूध दुभतं आटलं
गाई वासरे पोरांचं
पाठ पोट एक झालं

देह फुफाट्यात कसा
निपचीत आंबलेला
काळ्या माईचाही श्वास
तान्ह्यासाठी खोळंबला..!

तिनं धरलीया तग
तुला यावी जरा कीव
जरा बुजवाव्या भळी
तिचा वाचवाया जीव..!

तुझी काढीन नजर
तुझी करीन आरती
शेरनी वाटीत जाईन
गूळ भरून पराती..!

**– विनिता कुलकर्णी पाटील**
**लातूर**
**९५२७४२०८००**

## घरटं

घरटं तुझं चिऊताई
घरात माझ्या बांधून घे
तुझ्या माझ्या मनातली
दुरी तू सांधून घे



तू म्हणशील तसंच
सारं घडणार आहे
तू जर म्हणशील पावसाला
पाऊसही पडणार आहे!

माझ्या अंगणातील पारिजात
तुझ्यासाठीच असणार आहे
माझं पिल्लू आता तुझ्या
पिल्लाबरोबर बसणार आहे
तू म्हणशील....

सध्याचे हे मृगजळासारखें दिवस
सर्रकन निघून जातील
पुन्हा तेच सोन्याचे
दिवस परतून येतील
पुन्हा अंगणी तुळस अन्
तुळशीपुढे दिवा असेल
देवघरातील समई ही
नव्याने तेवणार आहे
तू....

कारण चिऊताई, इथं आता
सारं पुर्वीसारखं होत आहे
चांदोबा ही रोज माझ्या
अंगणात येत आहे
माझ्या बाळाची शाळा



तुझ्या झाडाखालीच भरणार आहे
तू....

तू रुसल्यापासुन पाऊसही
रुसला आहे
विज्ञानाचा कावळाही
काव-काव करुन
थकला आहे
मोत्याची कणसं तर
केव्हाच ईसाळून गेलीत
तेव्हापासून माणसाची मनंही
पिसाळून गेलीत
तू नाही आलीस तर
माणुसकीच सडणार आहे
तू....

**– सौ. शैलजा कारंडे (नागिमे)**
**९८२३६६५०९६**

## घाम पेरतो घास तुम्हाला मिळतो आहे



घाम पेरतो घास तुम्हाला मिळतो आहे;
उपरे जीवन शेतकरी हा जगतो आहे!

कूपनलीका विहीर बारव अटले सारे,
कोण बिचारा फास नव्याने वळतो आहे?

पगार पाणी वरचे लोणी मिळते तुम्हां,
धोतरात या घाम आमुचा गळतो आहे!

मराठवाडा शेतकऱ्यांची भूमी जेथे,
शेतकरी हा नभास डोळे पुसतो आहे!

ऊसतोड मी मजूर माझी कुठे दिवाळी,
भुकेस कोंडा निजेस धोंडा जगतो आहे!

उजाड माळावरचे मोठे एक झाड मी,
वादळवाऱ्यासमोर या करकरतो आहे!

गांधी खातो गोळ्या येथे रोज रोज अन्,
अजिंक्य हिटलर विश्वामध्ये ठरतो आहे!

अंधाराला भेदुन यावा एक कवडसा
अंधाराने पोत मनाचा ढळतो आहे!

मुकाट वाटा तुडवत आहे सुख दुःखाच्या,
भावभावना खुशाल माझ्या विकतो आहे!

हताश हतबल पहात बसलो नंगी दुनिया,
नागव्यांत या नागवाच मी दिसतो आहे!

**– राज पठाण**
अंबाजोगाई, जि. बीड
९७६४९८०२२४



## चाहूल



सृष्टिवरचे कोप झेलूनी मातीतून घे फूल
फुलातून ह्या उभ्या जगाची पेटत असते चूल

मातीमध्ये पेरलेस तु आयुष्याचे मूळ
मुळातून त्या फुलून आले धनधान्याचे कूळ
पालापाचोळा तुझ्या अंगणी ही कोणाची भूल

काळीमध्ये राब राबूनी हिरवा झाला मळा
रंगबदलत्या जगी तुझा रे कोरा दिसतो फळा
अज्ञानाच्या पाठीवर बघ दारिद्र्याची झूल

शोषकऱ्यांची भीड पाहूनी हाती घे तू विळा
भित्रा बनुनी नको अडकवू फासामध्ये गळा
बळीराज्याचे घेवुनी नांगर कर तू हक्क वसूल

तंत्राची तू कास धरूनी घे मानाचा तुरा
वाढवित जा कर्मानी हा समृद्धीचा धुरा
नांदशील तू दारी सुखाच्या घे थोडी चाहूल

**– धिरजकुमार बी. ताकसांडे**
हिंगणघाट, वर्धा
९४०४१९१९७४

## चिमण्या



कशी उडत ही आली, माझ्या गावची पाखरं
कशी स्वागताला जाऊ, वेळ सांजेला कातर।।धृ।।

तुही चिवचीवाट रे पामरा
याद माहेरची देते,
साऱ्या सोसल्या कष्टांना
मन भुलून रे जाते
काय सांगावी रे, तुला संसाराची चाकर।।१।।

चिमण्या सांगणारे बापा
आबांच्या शेतीचे हाल,
कसं जाईल रे त्यांना
दुष्काळाचं हे सालं
दृष्ट निसर्ग अमुचा, तोडतो तोंडची भाकर।।२।।

चिमण्या दादाला रे सांग
उभं पिकं वाळून गेलं,
रात्रंदिन राबलो आम्ही
सारं मातीतच गेलं
दुष्काळाच्या दिसात म्हणा लाव हात भार।।३।।

**– राजीव जावळे**
बुलडाणा
७७१९९९५१११



## जय जवान जय किसान



जो तो कापते तुहीच सरकी मान
बोला जय जवान – जय किसान

....तू हायस बापा देशाचा पोसिंदा
वावरात करतं लेका मरेलोक धंदा
तुह्या पैशावर करतात वान्नेरं काशी
तू काऊन घेतं भौ झाडाले फाशी
असं कसं तुव्हच वाजलं पानदान
बोला जय जवान....

बियानं पेरतं लावून छातीले माती
तरी नाई येत फुटकी कवळी तुह्या हाती
सरकारई देत नाई तुह्या घामाले दाम
तरी मुकाट्यानं करतं ढोरासारकं काम
कसा सोसतं बाप्पा तू एवळा मोठ्ठा तान
बोला जय जवान....

बायकोले नसते तुह्या धड नेस्याले लुगडं
कापूस पेरून तुव्ह पोट्टं काऊन फिरते उघडं
भाव नाई भेटत असं लावलं फक्त टुमनं
कसा नाई भेटत भाव टोचनं त्याईले रुमनं
पांढऱ्या डुकराईले जरा चांगला दनका हान
बोला जय जवान – जय किसान

**– प्रकाश मोरे**
**अकोला**
**७२७६६९८६०५**

## जीवन एक लढाई



जीवन एक लढाई
घाव होतील पावलोपावली
वार होतील ठायी ठायी
तरी खचून जायचं नाही
असं मैदान सोडायचं नाही
नको लावूस फास गळ्याला
तुला जगवंल काळी आई
हे जीवन एक लढाई
कधी हिंमत हारायची नाही।।धृ।।

तुझ्या पोराचा बघ जरा मुखडा
त्याला म्हणतोस काळजाचा तुकडा
बघ पोरीचं हासरं रूप
तिला शिकायचं आहे खूप
तुझ्या घरात बिमार माय
बाप म्हातारा करील काय
किती राबून राबून थकली
तुझी बायको बघ किती सोकली
गोठ्यातल्या मुक्या जनावराचाही
विचार कर गड्या काही
जे जीवन एक लढाई
कधी हिंमत हारायची नाही।।१।।

कास्तकारी हे कठीण काम
तुझ्या जीवाला नसे आराम
जरी मातीत आटवलं रक्त
शेतमालाला मिळेना दाम
तुझं जीणं भारी खडतर
हे सगळं सगळं खरं
पण तुझ्या ह्या प्रश्नावर
आत्महत्या नसे उत्तर



घाबरण्याने तुझ्या अशा
गड्या, पर्वत झाली राई
हे जीवन एक लढाई
कधी हिंमत हारायची नाही।।२।।

'शाही' लोकांची ही लोकशाही
त्यांच्या छातीत काळीज नाही
असं कसं हे स्वातंत्र्य आलं
तुझ्या जीवनाचं मातेरं झालं
एकजुटीनं सत्तेशी झगड
नाक दाबून तोंड तिचं उघड
घात आजवर जिनं तुझा केला
टाक जाळून ह्या व्यवस्थेला
पेटून ऊठ, जरा आवळून मूठ
तुझ्या दुनिया झुकेल पायी
हे जीवन एक लढाई
कधी हिंमत हारायची नाही।।३।।

**– किशोर बळी**
**अकोला**
**९४२१६७७१८१**

# जुगार



पीक हालतं डोलतं
सारं करपून गेलं
या बाजिंद्या पान्यानं
काई खरं नाई केलं

जिंदगानीले पिसून
असा जुगार लावला
दाना पेरला भूईत
पाखराच्या चोचीतला
सादं-सुदं नोतं बीज
त्याचं लई होतं मोल
या बाजिंद्या पान्यानं
काई खरं नाई केलं

किती तहानलं बीज
खोल-खोल नाई ओल
झाल्या घुगऱ्या बियानं
बीज झालं मातीमोल
अवंदाचंई बोहारं
साल आलं तसं गेलं
या बाजिंद्या पान्यानं
काई खरं नाई केलं

भाव नाई संबाराले
नाई वांग्यालेई भाव
माहा इचारात जीव
इकू काय? खाऊ काय?
मन जये रातदिस
उपाशीच राहे चूल
या बाजिंद्या पान्यानं
काई खरं नाई केलं



किती लाळा नवसानं
सोयाबिन वाळवलं
बांडबोहाऱ्या वानाचं
निऱ्हा फोलफट झालं
उभं पिक नांगरानं
सारं मातीत दाबलं
या बाजिंद्या पान्यानं
काई खरं नाई केलं

कशी रूसली पऱ्हाटी
लळे माह्यासंगं माती
करु दिवाईसनाले
कोन्या कापसाच्या वाती
सोनं पांढरं पांढरं
असं कसं दिठावलं?
या बाजिंद्या पान्यानं
काई खरं नाई केलं

**– संघमित्रा खंडारे**
**दर्यापूर**
**९४२२०१६५३१**

# झोपी गेलं रे सरकार



हे बळीराजा
तुझ्या नावातला राजा
हरवून टाकला रे
या पाषानरुपी शासनाने
आणि नुसताच
बळी दिला जातोय तुझा
दर दिवशी नित्य नेमाने

तू पिकवलेल्या कापसाचे
वस्त्र बनलास
अन् अब्रू झाकली
समस्त मानव देहाची
आणि तरीही तुझंच पोर नागडं

पण, एक मेहरबानी
केली तुझ्यावर
तोच कापूस
दोन बनला
आणि खुणावतो कसा
आवळून घे
तुझ्याच गळ्यात म्हणून

झोपी गेलं रे सरकार
शांत झोपू दे त्यांना
होवू दे पंचनामा
तुझ्या देहाचा
येतील ते सांत्वन करण्या
तुझ्या बायका पोरांचा

**– रामकृष्ण मार्खंडी रोगे**
चंद्रपूर
७५८८८८३२९७



# ती....



काळ्या मातीत खुरपतांना,
लुगड्याचा पदर डोक्यावर सावरत,
मधेच आभाळाकडे जायची तिची नजर
कपाळावर गडद चिंतेच्या रेषा,
त्याहून गडद डोळ्यांतली निराशा...

मग कधीतरी क्षितिजावर दिसायची
काळी किनार पावसाळी ढगांची
वाजत-गाजत यायची स्वारी
वर्दी देत मृगाची....

पहिल्या सरीसवे तिची
चिंता पण जायची ओघळून
हिरवे रान, हिरवे स्वप्न
डोळ्यांत रहायचे आकळून!

जित्रापांचे खाणे, जित्रापांची धार
जित्रांपांना पाणी कोण दावणार?
सकाळी बाहेर नेऊन परत
गोठ्यात कोण आणणार?

तिन्ही ऋतू तिन्ही काळ
तिचे चक्र घरघरायचे
ती म्हणजे शेत, ती म्हणजे घर
ती म्हणजे... सर्वकाही!

....आता फोटोतली 'ती' पहाते टूकुटूकु
शेतात तण माईना, पिकाला पाणी कोणी देईना
भाऊबंदकी शिरली घरात मागल्या दाराने
उतरल्या भिंती चौ-अंगाने

जित्राप केविलवाणी २४ तास गोठ्यात
सगळेच आहेत आता आपापल्या ताठ्यात
फोटोतल्या फोटोत ती उसासते
भकास नजरेने पहात रहाते

दिसत नाही आता नजरेला
क्षितिजावरचा पावसाळी मेघ
दिसते भेगाळलेली काळी भुई
अन्...सात-बारावरची रुंदावणारी रेघ!!!

**– विनिता माने – पिसाळ**
**पुणे**
**७७०९०७३००८**



## तू जाण माणसा, सुजाण माणसा



तू जाण माणसा, सुजाण माणसा
फुलबागेचे कोणी केले, रान माणसा

शेतकऱ्याची बैलगाडी, लुळी-पांगळी झाली
वादळ वारा काळ पेटला, कोणी नाही वाली
अश्रू ढाळतो शेतकरी, दया न माणसा
फुलबागेचे कोणी केले, रान माणसा
तू जाण माणसा, सुजाण माणसा

खेळ मांडुनी क्लृप्त्यांचा, करणी केली मोठी
पांढरपेशा कावळ्यांनी, धरणी केली खोटी
अन्यायाने घोट घेतला, छान माणसा
फुलबागेचे कोणी केले, रान माणसा
तू जाण माणसा, सुजाण माणसा

लय वज केली मातीची, छातीला लावून
आयुष्याची माती झाली, शेतीला वाहून
शेतकऱ्यांची सुळावरती, मान माणसा
फुलबागेचे कोणी केले, रान माणसा
तू जाण माणसा, सुजाण माणसा

शेतकऱ्यांच्या कामकऱ्यांच्या, घामाचे खाऊन
मातीला ही विसरून गेले, ए.सी. त राहून
शेतकऱ्यांचे नाही कुणाला, भान माणसा
फुलबागेचे कोणी केले, रान माणसा
तू जाण माणसा, सुजाण माणसा

भूमातेच्या पदरी केली, शेती लाजवंती
ओठ आपले हाय म्हणावे, आपल्याच दंती
शेतकऱ्यांनी काय करावे, दान माणसा
फुलबागेचे कोणी केले, रान माणसा
तू जाण माणसा, सुजाण माणसा

**– डॉ. रविपाल भारशंकर**
वर्धा
९८९००५९५२१

## दुष्काळ



असा कसा रे तू दुष्काळ
तूस नाही काही वेळ काळ।।

येतोस घेउनी आमुचा तू काळ
आयुष्याची करितो तू आबाळ।।

कधी कधी फाटते आभाळ
आटती नदी नाले अवकाळ।।

पेरलं रानात बियाणं मायंदाळ
भुईला नको करू तू घायाळ।।

जगायचं कस घेउनी लेकरबाळ
अन्नान करिती समदी पिलावळ।।

राजकारणी आमुचे थोर वाचाळ
करिती घोषणा सबसिडीच्या नाठाळ।।

नकोशी झालिय आता ही भिक्षावळ
आयुष्याची कशी झालीया होरपळ।।

हाती आमुच्या असती सदैव फाळ
जोडली आहे आमची मातीशी नाळ।।

का रं असं नाचवितो पायी बांधुनी चाळ
सपान पडतं रं कधी हाती येतील टाळ।।

साकड घालितो आम्ही घेउनिया माळ
नको सावट हे दुष्काळाचे सदा सर्वकाळ।।

**– रविंद्र कामठे**
**पुणे**



## नमन श्रमदेवाला...!



अविरत अवनीवर जो घाम गळवतो
त्या देवाला मी नमन करितो
त्या देवीला मी नमन करितो
श्रमदेवीला मी नमन करितो
श्रमदेवाला मी नमन करितो
जो अवनीवरती घाम गळवतो।।

खांदी नांगर हाती न्याहारी
मनपटलावर स्वप्नं रूपेरी
नाही कंदील, नाही विजेरी
भल्या पहाटे निघते स्वारी
नितदिन अवनीस जो घास भरवतो
त्या देवाला मी नमन करितो।।

बाळ चिमुकले पाठीवरती
सरपण मोळी डोईवरती
पदर खोचून कमरेभवती
गायवासरू हाकत पुढती
घागर-विळा खांदे सजवतो
त्या देवीला मी नमन करितो।।

मांजरझाकट वा रामप्रहरी
पाऊस, थंडी, उन्हं दुपारी
वेळी-अवेळी जित्रूप चारी
जागलखोपा सजवी शिवारी
'अभय' अविचल जो अन्न पिकवतो
त्या देवाला मी नमन करितो।।

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**
**९७३०५८२००४**

## नावहीन गाववेदना



जगायचा हिशोब गड्या
तुझ्यापुढे मांडतो आहे
विखुरलेल्या गवताची
काडीकाडी बांधतो आहे.....१

बांधावरल्या भांडणातच
पिढ्या साऱ्या झाल्या खोरी
अज्ञानाचे वाढवीत तण
दलालांच्या पिकल्या बोरी.....२

राजकारण गावकीचे
भावकीचेही उसवी टाके
हाती धरल्या फावड्याने
भावाचेच फोडतो डोके.....३

वास भिजत्या मातीचा
बेंबीदेठी भिनला पाहिजे
शेजाऱ्याच्या वावरातही
वारस तुझा रांगला पाहिजे.....४

एकोप्याचे मांड गणित
कानामनात कर पेरणी
जागतिकीकरणासाठी
बांधाबांधात कर बांधणी.....५

मातीपोटी पोसले वैर
मुळ्या उकरून खांडतो आहे
नावहीन गाववेदनेतून
हुंकार नवा सांडतो आहे.....६

**– रावसाहेब जाधव (चांडवड)**
९४२२३२१५९६



## पायाखालची वीट दे....!



पंढरीच्या पांडुरंगा
तुझ्या चरणी ठाव दे
तीर्थप्रसाद काही नको
शेतमालास भाव दे

दुर्दशेने फस्त केल्या
रानाकडे ध्यान दे
शहरावाणी खेडे होईल
असे थोडे ज्ञान दे

हृदयामध्ये राम आणि
मुखामध्ये नाम दे
सूट-माफी-सवलत नको
घामासाठी दाम दे

पाऊस पाणी येऊ दे
शेत माझे न्हाऊ दे
चोच फुटल्या अंकुरांना
दोन घास खाऊ दे

संपत्तीच्या वृद्धीसाठी
लालसेचा रोग दे
शेतीमधल्या कष्टालाही
वेतनवाला आयोग दे

देवा मला चारदोन
सवंगडी धीट दे
हरामींना कुटण्यासाठी
पायाखालची वीट दे

वास्तवाच्या शोधासाठी
डोकं थंडगार दे
लढवैयांच्या लेखणीला
'अभय' आणि 'धार' दे

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**

## पाहून घे महात्म्या



पाहून घे महात्म्या, इथली शिवार राने
केला भकास भारत, शोषून इंडियाने

तुमचे विचार बापू, गाडून पूर्ण केला
तुमचा बघा पराभव, तुमच्याच वारसाने

चाकू-सुऱ्या प्रमाणे, हातात पेन त्यांच्या
जितके लुटायचे ते, लुटतात कायद्याने

संपूर्ण सातबारा, कोरा करू म्हणाले
भुललेत भाडखाऊ, दिल्लीत पोचल्याने

आसुड उगारणारा, माझा स्वभाव नाही
पण; वेळ आणली या, मग्रूर लांडग्याने

वृद्धाश्रमात आई, गोतावळ्यास झुरते
गायीस मात्र माता, म्हणतात गौरवाने

इतुकेच शोध उत्तर, मातीत राबणाऱ्या
बदलेल भाग्य निव्वळ, तू घाम गाळल्याने?

मुर्दाड शासकांना, सोयरसुतूक नाही
हकनाक तूच मरशिल, गळफास घेतल्याने

शेती कसून दाखव, विद्याप्रचूर तज्ज्ञा
सुटणार प्रश्न नाही, बुद्धी उगाळण्याने

लक्ष्मीस आणखी मी, सांगा किती पुजावे?
नांदूच देत नाही, ही अवदसा सुखाने!

डोक्यास ताण दे तू, अन सोड आत्मग्लानी
काही तरी 'अभय' कर; मुक्ती मिळेल ज्याने

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**



## बळीराजा



बळीराजाच्या नजरेतही अंगार आहे
व्यथेने दुष्काळाच्या तो सध्या बेजार आहे।।

करतो मशागत कष्टाने काळ्या मातीची
दैवाच्या दरबारात तो निराधार आहे।।

का बरे त्याला सारे म्हणतात बळीराजा!
तसा त्याला राजाचा काय अधिकार आहे।।

एक एका ढेकळावर लावतो जीव हा
पाण्याच्या थेंबाचाही त्यालाच नकार आहे

पिकलं रान तर येई आयुष्यात शान
जळलं तर पाडती दोरीवर भार आहे।।

फार झाले आता परिस्थितीचे हे चोचले
व्यथेवर मात करण्याचा निर्धार आहे।।

नाही सरकारात कुठल्याही खरा जोर
येथे सगळा खुळ्यांचाच कारभार आहे।।

बळ येऊ दे आता बाहूत दहा हत्तींच
राजा तुझ्यावरच देशाची मदार आहे।।

**– रविंद्र कामठे**
**पुणे**
**९८२२४०४३३०**

## बळीराजा



श्रमाची भाकरी ज्यांना इथे तू घातली राजा
तुझी का मान केसाने तयांनी कापली राजा

मजेने पाव लोण्याशी पहा खातात हे कुत्रे
तुझी का लेकरे तान्ही उपाशी झोपली राजा

तुझ्या पैशावरी त्यांनी दिवाळी साजरी केली
तुझी होळीच स्वप्नांची कशी रे पेटली राजा

तुझ्या मालास लावावे मनाने भाव कोणीही
तरी सुलतानशाही तू मुक्याने सोसली राजा

तुझ्या हाती दिले नाही तयांनी दाम घामाचे
तुझ्या मालावरी त्यांनी कमाई लाटली राजा

तुला छेडावया येतो जरी दुष्काळ दरवर्षी
उधारी सावकाराची कशी तू फेडली राजा

तुझ्या त्या आत्महत्येची अखेरी बातमी झाली
उशाखाली तुझ्या होती विषाची बाटली राजा

**– प्रकाश मोरे**
**अकोला**
**७२७६६९८६०५**



## बाबा कसे



या आसवांना रिझविता बाबा कसे
हसण्यात रडणे लपविता बाबा कसे

असते उपाशी पोट तुमचे पण तरी
हा घास मजला भरविता बाबा कसे

पाहून हाती दोर भीती वाटते
कुंकू घराचे टिकविता बाबा कसे

वाहून जाते पीक हे डोळ्यांपुढे
नयनी पुराला पचविता बाबा कसे

अवघ्या पिकाला कर्ज नेते छाटुनी
व्याजात वावर पिकविता बाबा कसे

पोळ्याप्रमाणे नित्य बैलांची निगा
नाते बळीचे निभविता बाबा कसे

भरण्यास ‘फी’ पैसा बियाण्याचा दिला
जीवन मुलांचे फुलविता बाबा कसे

देता पहारा जागता शेतामध्ये
हे चंद्र तारे निजविता बाबा कसे

**– निलेश कवडे**
**अकोला**
**९८२२३६७७०६**

## बाबा गेले आभाळात



झोप झोप सोन्या आता
ढगांची करून सावली,
उस तोडते उन्हात
पोटासाठी रे माऊली।।

सोनू भाऊ राया माझा
किती किती गं शहाणा,
उगे उगे बाळा आता
मायचा आटला रे पान्हा।।

मिट मिट डोळे आता
घेई स्वप्नांच्या चाहुली,
बाबा गेले आभाळात
तुले आणाया बाहुली।।

सोनुराया ले आमच्या
साखरेचा गोड झोका,
जाऊ दे रे मला आता
मायचा तहानला घसा।।

उस तोडू तोडू आले
तिच्या हाताला रे फोड,
पांढऱ्या कपाळी पाहे
सोडू भविष्याचा कोडं।।

जाता डोईचे रे छत
नाती भिंतींनी सोडली,
रक्ताची कावले सारी
पिंड शिवून उडाली।।

झोप झोप सोन्या....

**– राजीव जावळे**
**जालना**
**९५०३७१९११७**



## बायल्यावाणी कायले मरतं?



बायल्यावाणी कायले मरतं? मर्दावाणी मरं!
सरणावरुन उठ... आनं... मशाल हाती धर...!!

तुह्यावाणी लाखो मेले... काही फरक पडला?
येथे सारे निगरगट्ट... काही बदल घडला?
त्यायच्यावाणी तू बी... फुक्कट जाशीन मरून
संसाराची धूळधान... व्हईन आणखी वरून
लढल्याबिगर मोक्ष नाय... कृष्णवचन स्मर...!!

कर्जपाणी, घेणंदेणं... आता चिंता सोड
आला दिवस तसा... मानून घे तू गोड
कुणी आला 'यम' दारी... शब्द त्याचे छाट
''पिकलं तवा लुटलं''... झालं फिट्टमफाट
धमन्यामंधी बारुद भर... आनं... आवाज मोठा कर...!!

जेव्हा पाय चालणारा... रस्ता जातो खुटून
श्वासाभरल्या विचारांचा... धागा जातो तुटून
तेव्हा तरी निग्रहाने... विवेकाला स्मर
ज्यांनी केली दुर्गती... त्यांची यादी कर
एकटा नको मरू... संग... दहा घेऊन मर...!!

कायदा तुह्या विरोधात... 'अभय' नाही तुले
म्हूनशान लढले भाऊ... शरद जोशी – फुले
तुह्यी हाक घेण्यासाठी... सरकार मूकं-बह्यरं
आपण सारे मिळून लढू... करू त्याले सह्यरं
लुटारुंचे रचू थर... आनं... नाचू गच्चीवर...!!

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**
**९७३०५८२००४**

## बोल बैला बोल



बोल बैला बोल तुला बोललंच पाह्यजे
बांधलेलं मुस्कं आता सोडलंच पाह्यजे...!

नांगर ओढू ओढू जेव्हा तोंड फेसाळंले
कोणी तरी आला का रे हाल पुसायाले?
ज्यांच्यासाठी पिकवलेस वखारभरून धान्य
आहेत का रे तरी त्यांना हक्क तुझे मान्य?
फुकामधी रक्त आटणं थांबलंच पाह्यजे...!

थंडी-पाऊस, ऊन-वारा छातीवरी पेलतोस
वादळाचे तडाखे शिंगावरी झेलतोस
तेव्हा कुठे हिरवीगार होते काळी आई
तरी का रे तुझे श्रम मातीमोल जाई?
लुटीचं अर्थकारण तू शिकलंच पाह्यजे...!

इच्छाधारी गायवासरे राजबिंडे नवी
खुर्चीसाठी त्यांना तुझी हाडंकुडं हवी
तुझे कष्ट त्यांचे लेखी भिक्षापात्रतेचे
ऐद्यांना देणार 'अभय' अन्न सुरक्षेचे
जागा हो बैलोबा तू जागलंच पाह्यजे...!

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**
**९७३०५८२००४**



## भय



तेवत्या दिव्यातील तेल आटू लागले
भय तमाचे या जिवास वाटू लागले।।

ओलांडली केव्हाच ती शीव सोसण्याची
सांधायचे कसे आभाळ फाटू लागले।।

आसूड नियतीचा की सूड निसर्गाचा
डोळ्यात पावसाळे बिऱ्हाड थाटू लागले।।

पौर्णिमा नाही कधी पाहिली स्वप्नातही
झाकण्या चंद्रास ते मेघ दाटू लागले।।

देशास या म्हणावे कृषिप्रधान कैसे
शेतकरी जेथे मृत्यूस गाठू लागले।।

**– विनोद मोरांडे**
नागपूर
मो. ९४२३६२१४७०

# भरवसा



आजकाल भरवसा राहीला नाही,
पावसा.... तुझा सुद्धा!

नांगरणी, पेरणी करून
आम्ही टाकतो निःश्वास
दडी मारुन बसतोस तू
गर्भातच बीजाचा घेतोस प्राण।।

खुरडत खुरडत आम्ही करतो
दुबार पेरणीची तयारी
कोसळतोस तू अपरिमित
होते बेकार मेहनत सारी।।

कधी कोरडा तर कधी ओला
दुष्काळ नेहमी नशीबाला
सांग का नाही कंटाळणार
शेतकरी आपल्या जीवाला।।

औंदा तरी नीट बरस
व्याज तरी फिटलं
सावकाराच्या फेऱ्यातून
गंठण तरी सुटलं।।

**– विनिता माने – पिसाळ**
**पुणे**
**७७०९०७३००८**



# भारत माझा देश आहे



फक्त दिवस साजरा करण्यापुरती,
कृतज्ञता आपली शेष आहे,
म्हणायला तर रोजच म्हणतो,
भारत माझा देश आहे....!

इथे संपत चालली माणुसकी,
मानवतेची कशी येते हुकी,
मानवता मानवता करणाऱ्यांचा,
दाखविण्यापुरता आवेश आहे ....!

रामराज्याचे दाखविता स्वप्न,
रामराज्याकरीता कुणी केले प्रयत्न,
यत्न नाही प्रयत्न नाही,
रामराज्याचे इथे फक्त,
शिल्लक अवशेष आहे ....!

भिन्न भाषा, भिन्न संस्कृती,
इथला भिन्न आहे वेश,
माणसामाणसात जाणीवपूर्वक,
पसरविला जातोय द्वेष,
जात भाषेचे स्तोम माजवून,
कालविले जाते विष आहे ....!

वंदेमातरम भारतमाता की जय,
दुमदुमतो जयघोष आहे,
स्वातंत्र्य प्रजासत्ताक दिनी,
देशभक्तीचा आवेश आहे,
देशही आपुला, भक्तिही अपुली,
मग सांगा व्यवस्थेत कुणाचा दोष आहे ....!

कष्टकरी नागविला जातोय,
धनिकांचे बदलत किती वेष आहे,
गरीबांस नाही भाकर इथे,

पण यांचा वाढतो कोष आहे,
असा हा गरिबअमीरीचा,
आवळत चालला पाश आहे ....!

धर्माच्या नावे इथे,
खपविले जाते सोंग,
धर्मवादात जड झाला,
माणसामाणसाचा रंग,
धर्मनिरपेक्षतेचे सोंग घेऊनच
मनामनात पसरविला जातो द्वेश आहे ....!

भारतमाताही गहीवरली असेल,
पाहुनी असले सोंग,
भ्रमीत झाली असेल पाहुन,
माणसाने धर्माचे वाटलेले रंग,
कुणास सांगेल भारतमाता,
तिच्या मनात काय क्लेष आहे ....!

**– श्रीकांत धोटे**
**रायगड**
**७८७५०३१८५२**



## माझा शेतकरी बाप



माझी शाळेची
फी भरण्यासाठी
जपून ठेवलेल्या रकमेतून
'चिरॉल' मलमची डबी घेण्यासही
नकार द्यायचा
तेव्हा
दुष्काळात शेतजमिनीला
पडलेल्या भेगा लहान
वाटायच्या
माझ्या शेतकरी बापाच्या
पायांच्या भेगांपेक्षा....।।१।।

पावसाळा सुरू झाला की
शाळेत जाताना मी भिजू नये
म्हणून
घेऊन द्यायचा मला
सात रंगांची छत्री
तेव्हा वाटायचा मला
माझ्या हाता इंद्रधनुष्य
देणारा बाप
आभाळाएवढा ....।।२।।

दुष्काळात कोमेजून जाणाऱ्या
पिकाकडे पाहताना
माझ्या बापाचे भरून आलेले डोळे
मी निरखून पाहत राहायचो.
तेव्हा वाटायचे
अवघे पीक ओलीतीखाली आलेले....।।३।।

आज शेतात
कोरड्याठण्ण मातीतही
तग धरून उभे असलेले
पीक पाहिले..
‘मातीत ही ताकद
कुठून आली असेल ?’
स्वतःलाच विचारला
एक अवैज्ञानिक प्रश्न..
आणि आठवला
आपले आयुष्य
इथेच पेरून बसलेला
माझा शेतकरी बाप....।।४।।

**– नजीमखान**
अकोला
९८५०८६७१६२



## माझी माय



माय कशी ही गा माझी
दिसरात गा राबते
कधी उन्हं, वारा, पाणी
अन दुष्काळ सोसते

माय कशी ही गा माझी
पाय तिचे अनवाणी
टोचे जिंदगीले काटे
पोठासाठी जळे ज्वानी

माय कशी ही गा माझी
एका लुगड्यात गोड
भोग संपेल हा कधी
दिसे हातावर फोड

माय कशी ही गा माझी
काळ्या मातीले जाणते
धनी आठवून गड्या
पाणी डोळ्यात आणते

माय कशी ही गा माझी
सुख-दुःख लपविते
माझ्याकडे गा पाहून
सारा देह झिजविते

**– दिपक यादवराव चटप**
चंद्रपूर
९१३०१६३१६३

# माणसासाठी कणसात दाणा



खळ्यावरचे खळते जगणे
कागदावरच पडती राशी
माना फिरवती ऊखळी सांधे
नगरामधले गणित उपाशी ....१

आशयाचे काळीज ओझे
शब्द कुणबी मळतो खांदा
सालभराच्या सोसिक तोंडी
सण पोळ्याचा रसिक मांडा ....२

हात हिकमती ओरबाडणारे
नागडी होते सुपीक माती
पंगत एकच खाणारांची
राबणारांच्या हजार जाती ....३

मांडीवरती दुष्काळाच्या
हंबरणारे दुधाळ चेहरे
पट मांडता महागाईचा
बदली सोंगट्या आपली घरे ....४

बुरखा ओढून निजती नगरे
माणुसकीने टाकल्या माना
माती मात्र जपते अजून
माणसासाठी कणसात दाना ....५

**– रावसाहेब जाधव**
चांदवड
९४२२३२१५९६



# मित्रा



अरे मित्रा, किती वाट पहावयास लावतोस
चिमणं-पाखरांचा घसा सुकलायं
आतुरल्या डोळ्यांनी ढगाकडं नजर लावून
बळीराजा आताशा थकलायं

मित्रा तुझं येणं आसमंतासाठी बहर
पानाफुलासाठी, रानावनातल्या सजीवांसाठी
तुझ येणं एक उत्सवच
तुझा एक एक थेंब मौल्यवान

मित्रा हे कळायला मात्र
उशीरच झाला खरा
तू एकदा का यायला लागलास
की विसरतो सगळे नियम

आणि मग तू ऋतूचक्राच्या तारखा
चुकवू लागलास की कळतं तुझ महत्त्व
अन् पळतं प्रत्येकाच्या तोंडच पाणी
कारण सारा राग रंगच बदलतो

तुझ येणं लांबलं की
सारे चक्रच बिघडते
व्यवहार मंदावतात
महागाई वाढते,
सारी धरती उदासते

अरे मित्रा, गतवर्षी
आज येशील, उद्या येशील म्हणत
बराच काळ वाट पहायला लावलास
त्यानंतरचे दिवस कसे गेले
काही विचारू नकोस

मित्रा, काय सांगू तुला
दुष्काळ पडला, माय बहिणी
मजल-दरमजल करत
पाण्याच्या शोधात फिरल्या
अन् उरल्या सुरल्या पाण्यावरून
धुर्त राजकारण्यांनी राजकारण केलं

मित्रा, यात भरडला गेला
तो एकमेव सर्वसामान्य व्यक्ती
कुणी खोल विहिरीत
तोल जाऊ पडलं
तर कुणी पाण्यासाठी
वणवण करत होरपळलं

अरे मित्रा, किती आस बांधली होती
आरं घरातलं किडूकमिडूक विकून
तुझ्यासाठी शेत नांगरलं
पण तू असा काही रागवलास
की फिरकलास नाही

मित्रा, अवकाळीच्या झंझावातानं
आधीच सारं काही हिरावलं
पण, तू येशील या आशेवर
दोन घास कमी खाऊन
बी-बियाणं राखलं

मित्रा, तुझ्या अवेळी येण्याचा
राग मनात होता खरा
पण, आता हे सारं आम्ही विसरलो
काही चुकलचं असलं आमचं
तर तू ही विसरून जा

अरे मित्रा, मैत्रित सारं काही,
माफ असतं नाही का?
मग मनात राग न धरता
जोरदार बरस जरा सा
सर सर सरी बरसू दे!
होऊन जाऊ दे धडाम धूम
पशू पक्षांना आनंदाचे गाणे फुटू दे!
रानोमाळ बळीराजाचे गीत उमटू दें!

**– नयन महेश राजमाने**
लातूर
९४२१६९२५५१



## मोरा मोरा नाच रे



मोरा मोरा नाच रे
अंकलिपी वाच रे
वाचता वाचता बोल रे
पृथ्वी कशी गोल रे

गोल चेंडू उडला
सूर्यावरती पडला
कान त्याचा कापला
म्हणून सूर्य तापला

ऊन, हवा आणि
गरम झाले पाणी
पाणी गरम झाले
वाफ होऊन आले

सोडूनिया धरती
वाफ गेली वरती
आभाळात मगं
तिचे झाले ढगं

ढग वाजे गडगड
वीज चमके कडकड
वारा सुटला सो-सो
पाऊस आला धो-धो

मोरा मोरा नाच रे
श्रावणाचा मास रे
नाचता नाचता सारा
फुलवून दे पिसारा

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**

## मी होतो बाप....



माझ्या हाती लेखणी
बापा हाती नांगर
बाप उकली ढेकूळ
माझे कागदी उत्तर ....

सरळ सऱ्या बापाच्या
माझ्या पठीत ओळी
पोळी माझ्या ताटात
बाप चुरतो शिळी ....

गर्भात हात मातीच्या
बाप करतो लावणी
मुखवट्यात कागदाच्या
माझी अक्षर पेरणी

रंगांनी तरारलेली
फुले माझी विकतात
बाप पेरतो सुगंध
तरी त्याची सुकतात ....

बोराटीच्या उलग्यात
अडकून पडला साप
बाप होतो मुलगा
आणि मी होतो बाप ....

**– रावसाहेब जाधव**
**चांदवड**
**९४२२३२१५९६**



## या जीवनात जे जे



या जीवणात जे जे होते घडून गेले
संदर्भ त्यात कडवे थोडे दडून गेले!!

नशिबास दोष आता देऊ कसा गड्यांनो
हातात कैक पाचू माझ्या जडून गेले!!

शोधात भाकरीच्या पेरीत घाम गेलो
अन् आयत्याच वेळी दाणे सडून गेले!!

अद्याप भाव नाही बोंडास फुटलेल्या
पण सावकार भडवे आले रडून गेले!!

पोटातल्या भुकेला जाणीव ना कशाची
फुलपाखरू सुखाचे हळवे उडून गेले!!

**– रवी धारणे**
**चंद्रपूर**
**९०४९००८५९३**

## रानमेवा खाऊ चला....!



या झरझर या, जरा भरभर या,
चला रानोमाळी भटकू चला
कुणी अंजीर घ्या, कुणी जांभूळ घ्या,
थोडा रानमेवा खाऊ चला ....।।१।।

ते उंच-उंच दिसते ते, ते फळ ताडाचे आहे
झाडांच्या डोक्यावरूनी, सूर्याचे किरण ते पाहे
कुणी कळवंद खा, कुणी चिक्कू-पेरू खा,
पाणी नारळाचे पिऊ या चला ....।।२।।

ते फुगले डोळे दिसते, ते सीताफळाचे आहे
खोप्यांच्या खिंडीमधुनी, ते चोरुनी पाडस पाहे
कुणी अननस खा, कुणी बोरं-लिंबू खा,
पाड आंबे वेचू या चला ....।।३।।

ही झाडे आहे म्हणुनी, सरसर पाऊस येतो
धरणांचे पोट भरूनी, धरणीला न्हाऊन जातो
कुणी टरबूज खा, कुणी खरबूज खा,
झरा झुळझुळ पाहू चला ....।।४।।

ही झुडपे-झाडे-वल्ली, सजीवांना अभय ती देती
ती सोडती ऑक्सिजनला अन कार्बन शोषूनी घेती
कुणी कलमा घ्या, कुणी रोपटी घ्या
झाडे घरोघरी लावूया चला ....।।५।।

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**
**९७३०५८२००४**



## विनासोबत्यांचा उभा जन्म गेला



विनासोबत्यांचा उभा जन्म गेला, नसे ओळखीचे तुझे नांव ही;
हजारो भुईवर ठसे पावलांचे, कुणाचा कुणाला नसे ठाव ही!

कसू मी कसा या जमीनीस माझ्या, बरसलाच नाही मनासारखा,
पिकविले जरी पीक घामावरी मी, मिळे रास्त कोठे तया भाव ही?

रुसू लागले हे सदा दैव माझे, झिजविला जरी मी तुझा उंबरा,
तुला का कळेना अरे शल्य माझे, तुला वर्ज्य झाला कसा साव ही?

ठगांचा इथे रोज सन्मान होई, लुटारू मजेने इथे नांदती,
पढतपंडितांच्या खुल्या दावणी या, दिसे भोवतीला बडेजाव ही!

इथे भुंकती श्वान धनदांडग्यांचे, कधी चावती सानशा वासरा,
खुल्यावर लुटू लागले इभ्रतीला, खुलेआम फिरती असे साव ही!

कुठे लुप्त झाल्या पिढ्या कालच्या त्या, विजांचे निखारे निवाले कसे?
दिसेना कुठे सत्य शांती अहिंसा, म्हणेना कुणी का चलेजाव ही?

**– राज पठाण**
अंबाजोगाई, जि. बीड
९७६४९८०२२४

## शब्द झाले शस्त्र त्यांचे वार झाले



शब्द झाले शस्त्र त्यांचे वार झाले;
पाहिली तलवार तेव्हा गार झाले!

गावगुंडांचा तिथे हैदोस चालू,
बोलती विद्वान येथे फार झाले!

पाह्यचे ऐकायचे होईल जे जे,
हेच साध्या जीवनाचे सार झाले!

मालवीले पेटलेले दीप कोणी,
झोपड्यांना प्यार की अंधार झाले?

घ्यायचे ना द्यायचे दुनियेस कांही,
एवढ्यावरती उभे संसार झाले!

**– राज पठाण**
अंबाजोगाई, जि. बीड
९७६४९८०२२४



## शेतकरी



दुष्काळाने तळमळणारा शेतकरी हा!
वणव्यामध्ये गरगरणारा शेतकरी हा!

भ्रामकतेचा शाप असावा भवतालाला;
मेघ गर्जना आठवणारा शेतकरी हा!

तळपायाला तळहाताला फोड उमटले;
उजाडरानी नांगरणारा शेतकरी हा!

अतिथीजैसा पाउस येतो अन जातोही;
पाण्यासाठी तडफडणारा शेतकरी हा!

वैषम्याचे सार्थक झाले असे वाटते;
साबिर जैसा सावरणारा शेतकरी हा!

**– बदीऊज्जमा बिराजदार**
(साबिर शोलापुरी)
सोलापूर
०९८९०१७१७०३

## शेतकऱ्यांचं सामर्थ्य



ठावुक आहे मला,
माझ्या शब्दात नाही,
जगण्याच बळ देण्याच सामर्थ्य,
पण व्हाव म्हणतो,
एक आधाराचा धागा,
शब्दातुनच का होईना,
घालावी म्हणतो फुंकर,
सांगाव्या म्हणतो वेदना,
ज्या कधीकाळी सोसलेल्या....

मुग गिळुन गप्प राहण्याइतका,
संवेदनाविहिन मि नाही....
जिथे झालेत पोशिंद्याचे हाल,
गावशिवारं झालीत बकाल,
पोशिंद्यास भाकरीची चिंता,
टक्कलावर केस उगविण्यासाठी धडपडतोय
शाकाल....

हे  भिषण आहे आणि तेच दुषण आहे,
मदतीचा हात घेऊन माणसं सरसावतात मदतीसाठी
पण दुसऱ्या हातात कॅमेरा घेऊन एक सेल्फी म्हणत
दाखवतात आपला सेल्फीशपणा आणि वाटत मग एका
हातात चाकलेट देवून दुसऱ्या हातान थोबाडात
हाणल्यासारखं....

तसं क्षीण झालं इथलं जगणं,
सेल्फीश माणसांचं सेल्फीश वागणं,
दिवसेंदिवस वाढणारी समाजातली माणसामाणसातली
दरी,
वाटतं जी आपल्यालाच लोटण्याकरीता बनविण्यात
आली आहे....

आणि मन खिन्न होतं,
मन सुन्न होतं,
स्वतःच लाचारीपण डिवचत,
का जगतोय मी, कशासाठी जगतोय मी,



आणि वाटत पोशींदा म्हणतात,
पण हे विशेषण आहे कि दुषण,
आणि मग येतात नको ते विचार....

इथपर्यंत ठीक आहे मात्र,
आता यापुढचा विचार तू थांबव,
तू लाचार समजु नकोस स्वतःला,
कारण जे भिकार आहे त्यांनी भीक मागूनच जमविली न
ही माया....
स्वतःचे इमले चढवितांना तू गाळलेल्या घामाचं दाम
यांनीच लुटलंय नं,
मग तू किती मोठा.....

आता घ्यावी लागेल पुन्हा तुला उभारी,
या गगनात घ्यावी लागेल भरारी,
आणि आपल्या चिलापिलांना द्यावं लागेल बळ,
आणि त्यांना सांगाव लागेल कि हे जे मोठमोठे इमले
चढले ते माझ्या श्रमाचे आहे,
आणि माझ्या श्रमावर मोठा होऊन,
ते तुला बळकावयाचे आहेत....

त्यासाठीच तर मी जगणार,
नकोसा भ्याड विचार सोडणार,
मला सिद्ध करायचं आहे माझ सामर्थ्य,
त्यासाठी उपाशी राहिल, राबराब राबेल,
पण मी हरणार नाही,
चिलापिलांना मागे सोडणार नाही....

आणि पुन्हा सांगतो की,
जरी जगण्याचं बळ देण्याच सामर्थ्य,
माझ्या शब्दात नसलं तरी,
याच शब्दातून मी मुठभर अमीरांना सांगेल,
कि तुमचे जे मोठमोठे जे इमले चढलेत,
त्याच्या पायापासून टोकापर्यंत,
माझ्या पोशिंद्याच्या रक्ताच्या थेंबावर उभे आहे....

**– श्रीकांत धोटे**
टाकळी चनाजी, जि. वर्धा
७८७५०३१८५२

## शेतकऱ्यांचा गळफास



एक म्हणे झुनका भाकर,
दूजा म्हणे मुलांना सकस आहार
दोघेही शेतकऱ्या लुटती,
तेच सर्वांना वाटती।

शेतकरी झाला लाचार, कर्जबाजारी,
म्हणे आणून द्या लटकायला दोरी।
मुले शिक्षण सोडोनि घेई कटोरी,
शासनाने केले मालकाचे पोर भिकारी।

पुढारी म्हणे देशाचा नागरिक स्वाभिमानी व्हावा,
कर्म उलटे करोनि त्याचाच घेई चावा।
तूट होती तेंव्हा लूट केली,
कोहळे काढूनि आवळ्याची सूट दिली।

शेतकऱ्या न कळे लूट,
तो मागे सबसीडी सूट।
उठ सूट पुढारी घोषणा करि,
हा ऐकतो आस ठेओनि चौकावरी।

पुढारी झाले बंदर,
पक्षात उड्या मारती सुंदर।
शासनात असता म्हणती शासनाचे,
रिकामे होताच होई लोकांचे।

सांगे माझ्या सारखा मीच फौलाद,
ऐकणारे म्हणे ही तर सरड्याची औलाद।
ऐसा जाहला नेतृत्वाचा सत्यानास,
म्हणोनि घेई शेतकरी गळफास।

**– दिलीप भोयर**
**धनोडी, अमरावती**
**९७२००७४८८४**



## सांगू कधी



वेदना माझ्या, कोणा मी, अता सांगू कधी
फाटक्या आभाळाला, ढिगळे लावू कधी।।

उसने अवसान, तरी मी आणू किती
उडालेल्या छपराला, सांग शोधू कधी।।

हंबरडा वेदनेने, मी फोडला किती
कान कोणा ऐकण्यास, असे मागू कधी।।

भेगाळलेल्या भुईला, आस पावसाची
ढगांवर बरसण्याची, सक्ती लादू कधी।।

काळजाला पडलेली, घरे होती किती!
नभांगणातल्या तारका, अशा मोजू कधी।।

पडुनी खिंडारे, शकले झाली भावनांची
आस जुळण्याची अशी, आता साधू कधी।।

**– रविंद्र कामठे**
**पुणे**
**९८२२४०४३३०**

## साबिरवाणी



आभाळाच्या डोळ्यामधुनी, अश्रू बरसे किंचित!
तहानलेल्या शेतकऱ्यांचे, मनही झाले विचलित!!
ऋतूच फसवे नशीबातले, उमलुन कोमेजावे!
माथ्यावर कर्जांचे डोंगर, सांग कसे फेडावे!!
मान टाकली आज पिकाने, सूकलेला हा घसा!
जीव जातसे बघती डोळे, सांग जगू तरी कसा!!
कडाडणाऱ्या विजांसोबती, भयाण वादळ वारा!
वळीव पाऊस पडून गेला, पिकास नाही थारा!!
जेथे-जेथे दृष्टी पडली, फक्त उन्हाचा वणवा!
रोज रोज बरसेल म्हणाले, मजला वाटे अफवा!!
ऋतूच ऐसा शेतकऱ्यांना, छळतो क्षणाक्षणाला!
कोण धनिक अन कोण दरिद्री, फरक पडे ना त्याला!!
नावाला बागायत आहे, खर्च करी बर्बाद!
काय म्हणू या ठिबक सिंचना, थेंबाला मोहताद!!
आभाळाने भरून येण्या, मनात भिजते गाणे!
अनाथ झाल्या चोचींसाठी, कुठून यावे दाणे!!
दुःख अकल्पित जरी भेटते, अवचित सुख ही मिळते!
ज्याच्या त्याच्या नशिबावरती, ते अवलंबुन असते!!
अर्ध्या वाटेवरून परतला, वळीव वाऱ्यासोबत!
अपराधी प्रियकरा सारखी, त्याची ही झाली गत!!
दुष्काळाचे दुखणे दुर्धर, दुनियेला या फारच!
कर्जामध्ये बुडून होतो, शेतकरी तर ठारच!!
कोण म्हणावे शेतकऱ्याला, नकोस घेऊ फाशी!
निघून गेला जरी एकटा, घर राहील उपाशी !!
पुण्यकर्म देवता भाग्यही, निष्फळ ठरती सारे!
प्रयत्न करणाऱ्याला 'साबिर', फळही मिळती सारे!!

– **बदीऊज्जमा बिराजदार** (साबिर शोलापुरी)
सोलापूर
९८९०१७१७०३



## सुनसान या घराला दळतात चार भिंती



सुनसान या घराला दळतात चार भिंती;
पाणावताच डोळे गळतात चार भिंती!

साम्राज्य राक्षसांचे आले जणूं जगावर,
वैश्विक उष्णतेने जळतात चार भिंती!

कांदा लसून मिरची पाणी न मीठ भाकर,
आणावयास मेथी पळतात चार भिंती!

पाऊस, उन्हं, वारा, जेंव्हा मुजोर होती,
तेंव्हा कुठे जगाला, कळतात चार भिंती!

रक्तातलीच नाती होती अबोल तेंव्हा,
ते बंध तोडतांना सळतात चार भिंती!

कैफात नाहती का येथे घरे कळेना,
का मोह मत्सराने चळतात चार भिंती!

त्या झोपडीत माझ्या होतो बरा सुखाने,
येथे इमारतींच्या मळतात चार भिंती!

**– राज पठाण**
अंबाजोगाई, जि. बीड
मो.नं. ९७६४९८०२२४

## स्वदेशीचे ढोंगधतूरे



एक आणखी झाडावरती लटकून मेला काल
तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल

पुन्हा एकदा बिनपाण्याने भाजून गेले शेत
एसीमध्ये आखतोस तू सटरमफटरम बेत
तुला दावतो भकासबंजर तू बांधावरती चाल

खते, औषधी, बीज, मजुरी दसपट झाले भाव
वीज, किराणा, डिझेल, डॉक्टर लुटून नेती गाव
अन् तुला पाहिजे स्वस्तामध्ये शेतीमधला माल

शेतपिकाच्या निर्यातीला जगात आहे वाव
बरकत येऊ शकते हे तर तुलाही आहे ठाव
तरी खेळतोस तू शहाण्या का रे तिरपी चाल?

आयातीवर सूट देऊनी गाडलास तू बळीराजा
म्हणून वाजतो दारापुढती अंत्यक्रियेचा वाजा
स्वदेशीचे ढोंगधतूरे; खातोस विदेशातली दाल

छल कपटाचा नाद सोडून भानावर ये आता
'अभय' जाहली जर भूमिकन्या, मरशील लाथा खाता
तुझी हुशारी, अक्कल तज्ज्ञा बेसुरी बेताल

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**
**९७३०५८२००४**



## हक्क जगण्याचे वंचित होते



प्रश्न खूप पडले होते
उत्तर त्याचे एकच होते।
प्रश्नातच आमुच्या
उत्तर हे दडलेले होते।।

भंगलेल्या स्वप्नांना
द्वार आसवांचे खुले होते।
आमिष गुलाबाचे हुंगतांना
काटे बोटांस बोचत होते।।

कोपलेल्या निसर्गावर
मात करण्याचे धाडस होते।
मातलेल्या सरकारचे
डोके ठिकाणावर कुठे होते।।

जळलेल्या शिवारात
जगणे कस्पटासमान होते।
पेरलेल्या जमिनीत
बियाणे कसे मुर्दाड होते।।

मदतीच्या घोषणांचे
पिक यंदा मायंदाळ होते।
घेणारे ते हात
मात्र दोरास लटकत होते।।

कुठवर सहावे बळीराजाने
दुःख त्याचे नागडे होते।
कधी अवर्षणाने, कधी अवकाळीने
हक्क जगण्याचे वंचित होते।।

**– रविंद्र कामठे**
**पुणे**

## हताश औदुंबर



ऐल तीरावर लाल शिरावर, लुकलुकता घेऊन
निळा पांढरा थवा चालला, रजःकण पांघरून
ढोलं-चौघडे, बोल बडबडे, खाकी गर्दी पुढे
सरावल्यांची पोपटपंची, गगन भेदुनी उडे

पैल तीरावर पत्र घरावर, तुळशीचे ठेवून
बेत शिजविला, देह निजविला, काळघुटी घेऊन
अभागीनीचे कुंकूम पुसता, अचेतन ती पडे
पोशिंद्याचा बाळ भुकेला, तिच्या उराशी दडे

दोन तीरांना अभये धारा, विलगे निरंतर
पाने गाळुनी मुंडण करितो, हताश औदुंबर

**– गंगाधर मुटे 'अभय'**
**वर्धा**
**९७३०५८२००४**



## हाडाचे शेतकरी



आम्ही हाडाचे शेतकरी
भक्ती आमची शेतावरी ।।धृ।।

आम्ही राबतो शेतात
देव दर्शन देई पिकात
आम्ही कष्टतो शेतात
देव डोलतो भातात

हिरवं करीतो शिवार
फुलवतो भूचे या आवार
तीच देई आम्हा धान्य अपार
तिचं दातृत्व रे फार

दिनभर करीतो काम
शेतात गाळतो घाम
तेव्हा मिळे कुठे दाम
उभा पाठी तो श्रीराम

आम्हा सावली ना माहीत
आम्ही राबतो उन्हात
देश हितासाठीच कष्ट
ठेवतो भाव मना मनात

**– शरद ठाकर**
परभणी
८२७५३३६६७५

